.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 3 ..

॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक ३ ॥

॥ दशक तिसरा : स्वगुणपरीक्षानाम ॥ ३॥

समास पहिला : जन्मदुःख निरूपण

॥ श्रीराम ॥

जन्म दुःखाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर ।
जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा ॥ १॥
जन्म कर्माची आटणी । जन्म पातकाची खाणी ।
जन्म काळाची जाचणी । निच नवी ॥ २॥
जन्म कुविद्येचें फळ । जन्म लोभाचें कमळ ।
जन्म भ्रांतीचें पडळ । ज्ञानहीन ॥ ३॥
जन्म जिवासी बंधन । जन्म मृत्यासी कारण ।
जन्म हेंचि अकारण । गथागोवी ॥ ४॥
जन्म सुखाचा विसर । जन्म चिंतेचा आगर ।
जन्म वासनाविस्तार । विस्तारला ॥ ५॥
जन्म जीवाची आवदसा । जन्म कल्पनेचा ठसा ।
जन्म लांवेचा वळसा । ममतारूप ॥ ६॥
जन्म मायेचे मैंदावें । जन्म क्रोधाचें विरावें ।
जन्म मोक्षास आडवें । विघ्न आहे ॥ ७॥
जन्म जिवाचें मीपण । जन्म अहंतेचा गुण ।
जन्म हेंचि विस्मरण । ईश्वराचें ॥ ८॥
जन्म विषयांची आवडी । जन्म दुराशेची बेडी ।
जन्म काळाची कांकडी । भक्षिताहे ॥ ९॥
जन्म हाचि विषमकाळ । जन्म हेंचि वोखटी वेळ ।
जन्म हा अति कुश्चीळ । नर्कपतन ॥ १०॥
पाहातां शरीराचें मूळ । या ऐसें नाहीं अमंगळ ।
रजस्वलेचा जो विटाळ । त्यामध्यें जन्म यासी ॥ ११॥
अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचाचि पुतळा ।
तेथें निर्मळपणाचा सोहळा । केवी घडे ॥ १२॥
रजस्वलेचा जो विटाळ । त्याचा आळोन जाला गाळ ।
त्या गाळाचेंच केवळ । शरीर हें ॥ १३॥
वरी वरी दिसे वैभवाचें । अंतरीं पोतडें नर्काचें ।
जैसें झांकणें चर्मकुंडाचें । उघडितांच नये ॥ १४॥
कुंड धुतां शुद्ध होतें । यास प्रत्यई धुईजेतें ।
तरी दुर्गंधी देहातें । शुद्धता न ये ॥ १५॥
अस्तीपंजर उभविला । सीरानाडीं गुंडाळिला ।
मेदमांसें सरसाविला । सांदोसांदीं भरूनी ॥ १६॥
अशुद्ध शब्दें शुद्ध नाहीं । तेंहि भरलें असे देहीं ।
नाना व्याधी दुःखें तेंहि । अभ्यांतरी वसती ॥ १७॥
नर्काचें कोठार भरलें । आंतबाहेरी लिडीबिडिलें ।
मूत्रपोतडें जमलें । दुर्गंधीचें ॥ १८॥
जंत किडे आणी आंतडी । नाना दुर्गंधीची पोतडी ।
अमुप लवथविती कातडी । कांटाळवाणी ॥ १९॥
सर्वांगास सिर प्रमाण । तेथें बळसें वाहे घ्राण ।
उठे घाणी फुटतां श्रवण । ते दुर्गंधी नेघवे ॥ २०॥
डोळां निघती चिपडें । नाकीं दाटतीं मेकडें ।
प्रातःकाळीं घाणी पडे । मुखीं मळासारिखी ॥ २१॥
लाळ थुंका आणी मळ । पीत श्लेष्मा प्रबळ ।
तयास म्हणती मुखकमळ । चंद्रासारिखें ॥ २२॥
मुख ऐसें कुश्चीळ दिसे । पोटीं विष्ठा भरली असे ।
प्रत्यक्षास प्रमाण नसे । भूमंडळीं ॥ २३॥
पोटीं घालितां दिव्यान्न । कांहीं विष्ठा कांहीं वमन ।
भागीरथीचें घेतां जीवन । त्याची होये लघुशंका ॥ २४॥
एवं मळ मूत्र आणी वमन । हेंचि देहाचें जीवन ।
येणेंचि देह वाढे जाण । यदर्थीं संशय नाहीं ॥ २५॥
पोटीं नस्तां मळ मूत्र वोक । मरोन जाती सकळ लोक ।
जाला राव अथवा रंक । पोटीं विष्ठा चुकेना ॥ २६॥
निर्मळपणें काढूं जातां । तरी देह पडेल तत्वतां ।
एवं देहाची वेवस्था । ऐसी असे ॥ २७॥
ऐसा हा धड असतां । येथाभूत पाहों जातां ।
मग ते दुर्दशा सांगतां । शंका बाधी ॥ २८॥
ऐसिये कारागृहीं वस्ती । नवमास बहु विपत्ती ।
नवहि द्वारें निरोधती । वायो कैंचा तेथें ॥ २९॥
वोका नरकाचे रस झिरपती । ते जठराग्नीस्तव तापती ।
तेणें सर्वहि उकडती । अस्तिमांस ॥ ३०॥
त्वचेविण गर्भ खोळे । तंव मातेसी होती डोहळे ।
कटवतिक्षणें सर्वांग पोळे । तया बाळकाचें ॥ ३१॥
बांधलें चर्माचें मोटाळें । तेथें विष्ठेचें पेटाळें ।
रसउपाय वंकनाळें । होत असे ॥ ३२॥
विष्ठा मूत्र वांती पीत । नाकीं तोंडीं निघती जंत ।
तेणें निर्बुजलें चित्त । आतिशयेंसीं ॥ ३३॥
ऐसिये कारागृहीं प्राणी । पडिला अत्यंत दाटणीं ।
कळवळोन म्हणे चक्रपाणी । सोडवीं येथून आतां ॥ ३४॥
देवा सोडविसी येथून । तरी मी स्वहित करीन ।
गर्भवास हा चुकवीन । पुन्हां न ये येथें ॥ ३५॥
ऐसी दुखवोन प्रतिज्ञा केली । तंव जन्मवेळ पुढें आली ।
माता आक्रंदों लागली । प्रसूतकाळीं ॥ ३६॥

नाकीं तोंडीं बैसलें मांस । मस्तकद्वारें सांडी स्वास ।
तेंहि बुजलें निशेष । जन्मकाळीं ॥ ३७ ॥
मस्तकद्वार तें बुजलें । तेणें चित्त निर्बुजलें ।
प्राणी तळमळूं लागलें । चहूंकडे ॥ ३८ ॥
स्वास उस्वास कोंडला । तेणें प्राणी जाजावला ।
मार्ग दिसेनासा जाला । कासावीस ॥ ३९ ॥
चित्त बहु निर्बुजलें । तेणें आडभरीं भरलें ।
लोक म्हणती आडवें आलें । खांडून काढा ॥ ४० ॥
मग ते खांडून काढिती । हस्तपाद छेदून घेती ।
हातां पडिलें तेंचि कापिती । मुख नासिक उदर ॥ ४१ ॥
ऐसे टवके तोडिले । बाळकें प्राण सोडिले ।
मातेनेंहि सांडिलें । कळिवर ॥ ४२ ॥
मृत्य पावला आपण । मातेचा घेतला प्राण ।
दुःख भोगिलें दारुण । गर्भवासीं ॥ ४३ ॥
तथापी सुकृतेंकरूनी । मार्ग सांपडला योनी ।
तऱ्हीं आडकला जाउनी । कंठस्कंदीं मागुता ॥ ४४ ॥
तये संकोचित पंथीं । बळेंचि वोढून काढिती ।
तेणें गुणें प्राण जाती । बाळकाचे ॥ ४५ ॥
बाळकाचे जातां प्राण । अंतीं होये विस्मरण ।
तेणें पूर्वील स्मरण । विसरोन गेला ॥ ४६ ॥
गर्भीं म्हणे सोहं सोहं । बाहेरी पडतां म्हणे कोहं ।
ऐसा कष्टी जाला बहु । गर्भवासीं ॥ ४७ ॥
दुःखा वरपडा होता जाला । थोरा कष्टीं बाहेरी आला ।
सवेंच कष्ट विसरला । गर्भवासाचे ॥ ४८ ॥
सुंन्याकार जाली वृत्ती । कांहीं आठवेना चित्तीं ।
अज्ञानें पडिली भ्रांती । तेणें सुखचि मानिलें ॥ ४९ ॥
देह विकार पावलें । सुखदुःखें झळंबळे ।
असो ऐसें गुंडाळलें । मायाजाळीं ॥ ५० ॥
ऐसें दुःख गर्भवासीं । होतें प्राणीमात्रांसीं ।
म्हणोनियां भगवंतासी । शरण जावें ॥ ५१ ॥
जो भगवंताचा भक्त । तो जन्मापासून मुक्त ।
ज्ञानबळें बिरक्त । सर्वकाळ ॥ ५२ ॥
ऐशा गर्भवासीं विपत्ती । निरोपिल्या येथामती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ५३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जन्मदुःखनिरूपणनाम
समास पहिला ॥ १ ॥ ३.१

समास दुसरा : स्वगुणपरीक्षा

॥ श्रीराम ॥

संसार हाचि दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ ।
मागां बोलिली तळमळ । गर्भवासाची ॥ १ ॥
गर्भवासीं दुःख जालें । तें बाळक विसरलें ।
पुढें वाढों लागलें । दिवसेंदिवस ॥ २ ॥
बाळपणीं त्वचा कोंवळी । दुःख होतांचि तळमळी ।
वाचा नाहीं तये काळीं । सुखदुःख सांगावया ॥ ३ ॥
देहास कांहीं दुःख जालें । अथवा क्षुधेनें पीडलें ।
तरी तें परम आक्रंदलें । परी अंतर नेणवे ॥ ४ ॥
माता कुरवाळी वरी । परी जे पीडा जाली अंतरीं ।
ते मायेसी न कळे अभ्यांतरीं । दुःख होये बाळकासीं ॥ ५ ॥
मागुतें मागुतें फुंजे रडे । माता बुझावी घेऊन कडे ।
वेथा नेणती बापुडें । तळमळी जीवीं ॥ ६ ॥
नानाव्याधीचे उमाळे । तेणें दुःखें आंदोळे ।
रडे पडे कां पोळे । अग्निसंगें ॥ ७ ॥
शरीर रक्षितां नये । घडती नाना अपाये ।
खोडी अधांतरीं होये । आवेवहीन बाळक ॥ ८ ॥
अथवा अपाय चुकले । पूर्णपुण्य पुढें ठाकलें ।
मातेस वोळखों लागलें । दिवसेंदिवस ॥ ९ ॥
क्षणभरी मातेस न देखे । तरी आक्रंदें रुदन करी दुःखें ।
ते समई मातेसारिखें । आणीक कांहिंच नाहीं ॥ १० ॥
आस करून वास पाहे । मातेविण कदा न राहे ।
वियोग पळमात्र न साहे । स्मरण जालियां नंतरें ॥ ११ ॥
जरी ब्रह्मादिक देव आले । अथवा लक्ष्मीने अवलोकिलें ।
तरी न वचे बुझाविलें । आपले मातेवांचुनी ॥ १२ ॥
कुरूप अथवा कुलक्षण । सकळांहूनि करंटेपण ।
तरी नाहीं तीसमान । भूमंडळीं कोणी ॥ १३ ॥
ऐसें तें केविलवाणें । मातेविण दिसे उणें ।
रागें परतें केलें तिनें । तरी आक्रंदोनी मिठी घाली ॥ १४ ॥
सुख पावे मातेजवळी । दुरी करितांचि तळमळी ।
अतिप्रीति तयेकाळीं । मातेवरी लागली ॥ १५ ॥
तंव ते मातेस मरण आलें । प्राणी पोरटें जालें ।
दुःखें झुर्णी लागलें । आई आई म्हणोनी ॥ १६ ॥
आई पाहातां दिसेना । दीनरूप पाहे जना ।
आस लागलिसे मना । आई येईल म्हणोनी ॥ १७ ॥
माता म्हणौन मुख पाहे । तंव ते आपुली माता नव्हे ।
मग हिंवासलें राहे । दैन्यवाणें ॥ १८ ॥
मातावियोगें कष्टलें । तेणें मानसीं दुःख जालें ।
देहहि क्षीणत्व पावलें । आतिशयेंसीं ॥ १९ ॥
अथवा माताहि वांचली । मायलेंकुरा भेटी जाली ।
बाळदशा ते राहिली । दिवसेंदिवस ॥ २० ॥
बाळपण जालें उणें । दिवसेंदिवस होये शाहाणें ।
मग ते मायेचें अत्यंत पेखणें । होतें, तें राहिलें ॥ २१ ॥
पुढें लो लागला खेळाचा । कळप मेळविला पोरांचा ।
आल्यगेल्या डायाचा । आनंद शोक वाहे ॥ २२ ॥ var डावाचा
मायेबापें सिकविती पोटें । तयाचें परम दुःख वाटे ।
चट लागली न सुटे । संगती लेंकुरांची ॥ २३ ॥
लेंकुरांमध्यें खेळतां । नाठवे माता पिता ।
तंव तेंथेहि अवचिता । दुःख पावला ॥ २४ ॥

पडिले दांत फुटला डोळा । मोडले पाय जाला खुळा ।
गेला माज अवकळा- । ठाकून आली ॥ २५ ॥
निघाल्या देवी आणी गोवर । उठलें कपाळ लागला ज्वर ।
पोटसुळीं निरंतर । वायगोळा ॥ २६ ॥
लागलीं भूतें जाली झडपणी । जळीच्या मेसको मायेराणी ।
मुंज्या झोटिंग करणी । म्हैसोबाची ॥ २७ ॥
वेताळ खंकाळ लागला । ब्रह्मगिऱ्हो संचरला ।
नेणों चेडा वोलांडिला । कांहीं कळेना ॥ २८ ॥
येक म्हणती बीरे देव । येक म्हणती खंडेराव ।
येक म्हणती सकळ वाव । हा ब्राह्मणसमंध ॥ २९ ॥
येक म्हणती कोणें केलें । आंगीं देवत घातले ।
येक म्हणती चुकलें । सटवाईचें ॥ ३० ॥
येक म्हणती कर्मभोग । आंगीं जडले नाना रोग ।
वैद्य पंचाक्षरी चांग । बोलाऊन आणिले ॥ ३१ ॥
येक म्हणती हा वांचेना । येक म्हणती हा मरेना ।
भोग भोगितो यातना । पापास्तव ॥ ३२ ॥
गर्भदुःख विसरला । तो त्रिविधतापें पोळला ।
प्राणी बहुत कष्टी जाला । संसारदुःखें ॥ ३३ ॥
इतुकेंहि चुकोन वांचला । तरी मारमारूं शाहाणा केला ।
लोकिकीं नेटका जाला । नांव राखे ऐसा ॥ ३४ ॥
पुढें मायबापीं लोभास्तव । संभ्रमें मांडिला विव्हाव ।
दाऊनियां सकळ वैभव । नोवरी पाहिली ॥ ३५ ॥
वऱ्हाडीवैभव दाटलें । देखोन परमसुख वाटले ।
मन हें रंगोन गेलें । सासुरवाडीकडे ॥ ३६ ॥
मायबापीं भलतैसें असावें । परी सासुरवाडीस नेटकें जावें ।
द्रव्य नसेल तरी घ्यावें । रुण कळांतरें ॥ ३७ ॥
आंतर्भाव ते सासुरवाडीं । मायेबापें राहिलीं बापुडीं ।
होताती सर्वस्वें कुडकुडीं । तितुकेंच कार्य त्यांचें ॥ ३८ ॥
नोवरी आलियां घरा । अती हव्यास वाटे वरा ।
म्हणे मजसारिखा दुसरा । कोणीच नाहीं ॥ ३९ ॥
मायबाप बंधु बहिणी । नोवरी न दिसतां वाटे काणी ।
अत्यंत लोधला पापिणीं । अविद्येनें भुलविला ॥ ४० ॥
संभोग नस्तां इतुका प्रेमा । योग्य जालिया उलंघी सीमा ।
प्रीती वाढविती कामा- । करितां प्राणी गुंतला ॥ ४१ ॥
जरी न देखे क्षण येक डोळां । तरी जीव होय उताविळा ।
प्रीतीपात्र अंतर्कळा । घेऊन गेली ॥ ४२ ॥
कोवळे कोवळे शब्द मंजुळ । मर्यादा लज्या मुखकमळ ।
वक्त्रलोकनें केवळ । ग्रामज्याचे मैंदावें ॥ ४३ ॥
कळवळा येतां सांवरेना । शरीर विकळ आवरेना ।
अनेत्र वेवसाई क्रमेना । हुरहुर वाटे ॥ ४४ ॥
वेवसाय करितां बाहेरी । मन लागलेंसे घरीं ।
क्षणाक्षणां अभ्यांतरीं । स्मरण होये कामिनीचें ॥ ४५ ॥
तुम्हीं माझिया जिवांतील जीव । म्हणौनी अत्यंत लाघव ।
दाऊनियां चित्त सर्व । हिरोन घेतलें ॥ ४६ ॥
मैंद सोइरीक काढिती । फांसे घालून प्राण घेती ।
तैसें आयुष्य गेलियां अंतीं । प्राणीयांस होये ॥ ४७ ॥
प्रीति कामिनीसीं लागली । जरी तयेसी कोणी रागेजली ।
तरी परम क्षिती वाटली । मानसीं गुप्तरूपें ॥ ४८ ॥
तये भार्येचेनि कैवारें । मायेबापासीं नीच उत्तरें ।
बोलोनियां तिरस्कारें । वेगळा निघे ॥ ४९ ॥
स्त्रीकारणें लाज सांडिली । स्त्रीकारणें सखीं सोडिलीं ।
स्त्रीकारणें विघडिलीं । सकळहि जिवलगें ॥ ५० ॥
स्त्रीकारणें देह विकिला । स्त्रीकारणें सेवक जाला ।
स्त्रीकारणें सांडविला । विवेकासी ॥ ५१ ॥
स्त्रीकारणें लोलंगता । स्त्रीकारणें अतिनम्रता ।
स्त्रीकारणें पराधेनता । अंगिकारिली ॥ ५२ ॥
स्त्रीकारणें लोभी जाला । स्त्रीकारणें धर्म सांडिला ।
स्त्रीकारणें अंतरला । तीर्थयात्रा स्वधर्म ॥ ५३ ॥
स्त्रीकारणें सर्वथा कांहीं । शुभाशुभ विचारिलें नाहीं ।
तनु मनु धनु सर्वही । अनन्यभावें अर्पिलें ॥ ५४ ॥
स्त्रीकारणें परमार्थ बुडविला । प्राणी स्वहितास नाडला ।
ईश्वरीं कानकोंडा जाला । स्त्रीकारणें कामबुद्धी ॥ ५५ ॥
स्त्रीकारणें सोडिली भक्ती । स्त्रीकारणें सोडिली विरक्ती ।
स्त्रीकारणें सायोज्यमुक्ती । तेहि तुच्छ मानिली ॥ ५६ ॥
येके स्त्रियेचेनि गुणें । ब्रह्मांड मानिलें ठेंगणें ।
जिवलगें तीं पिसुणें । ऐसीं वाटलीं ॥ ५७ ॥
ऐसी अंतरप्रीति जडली । सर्वस्वाची सांडी केली ।
तंव ते मरोन गेली । अकस्मात ॥ ५८ ॥
तेणें मनीं शोक वाढला । म्हणे थोर घात जाला ।
आतां कैंचा बुडाला । संसार माझा ॥ ५९ ॥
जिवलगांचा सोडिला संग । अवचिता जाला घरभंग ।
आतां करूं मायात्याग । म्हणे दुःखें ॥ ६० ॥
स्त्री घेऊन आडवी । ऊर बडवी पोट बडवी ।
लाज सांडून गौरवी । लोकां देखतां ॥ ६१ ॥
म्हणे माझें बुडालें घर । आतां न करी हा संसार ।
दुःखें आक्रंदला थोर । घोर घोषें ॥ ६२ ॥
तेणें जीव वारयावेघला । सर्वस्वाचा उबग आला ।
तेणें दुःखें जाला । जोगी कां महात्मा ॥ ६३ ॥
कां तें निघोन जाणें चुकलें । पुन्हां मागुतें लग्न केलें ।
तेणें अत्यंतचि मग्न जालें । मन द्वितीय संमंधीं ॥ ६४ ॥
जाला द्वितीय संमंध । सवेंचि मांडिला आनंद ।
श्रोतीं व्हावें सावध । पुढिले समासीं ॥ ६५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास दुसरा ॥ २ ॥ ३.२

समास तिसरा : स्वगुणपरीक्षा

॥ श्रीराम ॥

द्वितीय संमंध जाला । दुःख मागील विसरला ।
सुख मानून राहिला । संसाराचें ॥ १ ॥
जाला अत्यंत कृपण । पोटें न खाय अन्न ।
रुक्याकारणें सांडी प्राण । येकसरा ॥ २ ॥
कदा कल्पांतीं न वेची । सांचिलेंचि पुन्हा सांची ।
अंतरीं असेल कैंची । सद्वासना ॥ ३ ॥
स्वयें धर्म न करी । धर्मकर्त्यासहि वारी ।
सर्वकाळ निंदा करी । साधुजनाची ॥ ४ ॥
नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतित अभ्यागत ।
मुंगीमुखींचें जें सीत । तेंही वेंचून सांची ॥ ५ ॥
स्वयें पुण्य करवेना । केलें तरी देखवेना ।
उपहास्य करी मना- । नये म्हणौनी ॥ ६ ॥
देवां भक्तांस उच्छेदी । आंगबळें सकळांस खेदी ।
निष्ठुर शब्दें अंतर भेदी । प्राणीमात्रांचें ॥ ७ ॥
नीति सांडून मागें । अनीतीनें वर्तों लागे ।
गर्व धरून फुगे । सर्वकाळ ॥ ८ ॥
पूर्वजांस सिंतरिलें । पक्षश्राद्धहि नाहीं केलें ।
कुळदैवत ठकिलें । कोणेपरी ॥ ९ ॥
आक्षत भरिली भाणा । दुजा ब्राह्मण मेहुणा ।
आला होता पाहुणा । स्त्रियेस मूळ ॥ १० ॥
कदा नावडे हरिकथा । देव नलगे सर्वथा ।
स्नानसंध्या म्हणे वृथा । कासया करावी ॥ ११ ॥
अभिळाषें सांची वित्त । स्वयें करी विस्वासघात ।
मदें मातला उन्मत्त । तारुण्यपणें ॥ १२ ॥
तारुण्य आंगीं भरलें । धारिष्ट न वचे धरिलें ।
करूं नयें तेंचि केलें । माहापाप ॥ १३ ॥
स्त्री केली परी धाकुटी । धीर न धरवेचि पोटीं ।
विषयलोभें सेवटीं । वोळखी सांडिली ॥ १४ ॥
माये बहिण न विचारी । जाला पापी परद्वारी ।
दंड पावला राजद्वारीं । तऱ्हीं पालटेना ॥ १५ ॥
परस्त्री देखोनि दृष्टीं । अभिळाष उठे पोटीं ।
अकर्तव्यें हिंपुटी । पुन्हां होये ॥ १६ ॥
ऐसें पाप उदंड केलें । शुभाशुभ नाहीं उरलें ।
तेणें दोषें दुःख भरलें । अकस्मात आंगीं ॥ १७ ॥
व्याधी भरली सर्वांगीं । प्राणी जाला क्षयरोगी ।
केले दोष आपुले भोगी । सीघ्र काळें ॥ १८ ॥
दुःखें सर्वांग फुटलें । नासिक अवघेंचि बैसलें ।
लक्षण जाऊन जालें । कुलक्षण ॥ १९ ॥
देहास क्षीणता आली । नाना वेथा उद्भवली ।
तारुण्यशक्ती राहिली । खंगला प्राणी ॥ २० ॥
सर्वांगीं लागल्या कळा । देहास आली अवकळा ।
प्राणी कांपे चळचळां । शक्ति नाहीं ॥ २१ ॥
हस्तपादादिक झडले । सर्वांगीं किडे पडिले ।
देखोन थुंकों लागले । लाहानथोर ॥ २२ ॥
जाली विष्टेची सारणी । भोवती उठली वर्द्धाणी ।
अत्यंत खंगला प्राणी । जीव न वचे ॥ २३ ॥
आतां मरण दे गा देवा । बहुत कष्ट जाले जीवा ।
जाला नाहीं नेणों ठेवा । पातकाचा ॥ २४ ॥
दुःखें घळघळां रडे । जों जों पाहे आंगाकडे ।
तों तों दैन्यवाणें बापुडें । तळमळी जीवीं ॥ २५ ॥
ऐसे कष्ट जाले बहुत । सकळ जालें वाताहात ।
दरवडा घालून वित्त । चोरटीं नेलें ॥ २६ ॥
जालें आरत्र ना परत्र । प्रारब्ध ठाकलें विचित्र ।
आपला आपण मळमूत्र । सेविला दुःखें ॥ २७ ॥
पापसामग्री सरली । दिवसेंदिवस वेथा हरली ।
वैद्यें औषधें दिधलीं । उपचार जाला ॥ २८ ॥
मरत मरत वांचला । यास पुन्हां जन्म जाला ।
लोक म्हणती पडिला । माणसांमध्यें ॥ २९ ॥
येरें स्त्री आणिली । बरवी घरवात मांडिली ।
अति स्वार्थबुद्धी धरिली । पुन्हां मागुती ॥ ३० ॥
कांहीं वैभव मेळविलें । पुन्हां सर्वही संचिलें ।
परंतु गृह बुडालें । संतान नाहीं ॥ ३१ ॥
पुत्र संतान नस्तां दुःखी । वांज नांव पडिलें लोकिकीं ।
तें न फिटे म्हणोनी लेंकी । तरी हो आतां ॥ ३२ ॥
म्हणोन नाना सायास । बहुत देवास केले नवस ।
तीर्थें व्रतें उपवास । धरणें पारणें मांडिलें ॥ ३३ ॥
विषयसुख तें राहिले । वांजपणें दुःखी केलें ।
तंव तें कुळदैवत पावलें । जाली वृद्धी ॥ ३४ ॥
त्या लेंकुरावरी अतिप्रीति । दोघेहि क्षण येक न विशंभती ।
कांहीं जाल्या आक्रंदती । दीर्घस्वरें ॥ ३५ ॥
ऐसी ते दुःखिस्ते । पूजीत होती नाना दैवतें ।
तंव तेंहि मेलें अवचितें । पूर्व पापेंकरूनी ॥ ३६ ॥
तेणें बहुत दुःख जालें । घरीं आरंधें पडिलें ।
म्हणती आम्हांस कां ठेविलें । देवें वांज करूनी ॥ ३७ ॥
आम्हांस द्रव्य काये करावें । तें जावें परी अपत्य व्हावें ।
अपत्यालागी त्यजावें । लागेल सर्व ॥ ३८ ॥
वांजपण संदिसें गेलें । तों मरतवांज नांव पडिलें ।
तें न फिटे कांहीं केलें । तेणें दुःखें आक्रंदती ॥ ३९ ॥
आमुची वेली कां खुंटिली । हा हा देवा वृत्ती बुडाली ।
कुळस्वामीण कां क्षोभली । विझाला कुळदीप ॥ ४० ॥
आतां लेंकुराचें मुख देखेन । तरी आनंदें राडी चालेन ।
आणी गळही टोंचीन । कुळस्वामिणीपासीं ॥ ४१ ॥
आई भुता करीन तुझा । नांव ठेवीन केरपुंजा ।
वेसणी घालीन, माझा- । मनोरथ पुरवी ॥ ४२ ॥
बहुत देवांस नवस केले । बहुत गोसावी धुंडिले ।

गटगटां गिळिले । सगळे विंचू ॥ ४३॥
केले समंधाचे सायास । राहाणे घातलें बहुवस ।
केळें नारिकेळें ब्राह्मणास । अंब्रदानें दिधलीं ॥ ४४॥
केलीं नाना कवटालें । पुत्रलोभें केलीं ढालें ।
तरी अदृष्ट फिरलें । पुत्र नाहीं ॥ ४५
वृक्षाखालें जाऊन नाहाती । फळतीं झाडें करपती ।
ऐसे नाना दोष करिती । पुत्रलोभाकारणें ॥ ४६॥
सोडून सकळ वैभव । त्यांचा वारयावेधला जीव ।
तंव तो पावला खंडेराव । आणी कुळस्वामिणी ॥ ४७॥
आतां मनोरथ पुरती । स्त्रीपुरुषें आनंदती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ४८॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम
समास तिसरा ॥ ३॥ ३.३

समास चवथा : स्वगुणपरीक्षा

॥ श्रीराम ॥

लेंकुरें उदंड जालीं । तों ते लक्ष्मी निघोन गेली ।
बापडीं भिकेसी लागलीं । कांहीं खाया मिळेना ॥ १॥
लेंकुरें खेळती धाकुटीं । येकें रांगती येकें पोटीं ।
ऐसी घरभरी जाली दाटी । कन्या आणी पुत्रांची ॥ २॥
दिवसेंदिवसा खर्च वाढला । यावा होता तो खुंटोन गेला ।
कन्या उपवरी जाल्या, त्यांला- । उजवावया द्रव्य नाहीं ॥ ३॥
मायेबापें होतीं संपन्न । त्यांचें उदंड होतें धन ।
तेणें करितां प्रतिष्ठा मान । जनीं जाला होता ॥ ४॥
भरम आहे लोकाचारीं । पहिली नांदणूक नाहीं घरीं ।
दिवसेंदिवस अभ्यांतरीं । दरिद्र आलें ॥ ५॥
ऐसी घरवात वाढली । खातीं तोंडें मिळालीं ।
तेणें प्राणीयांस लागली । काळजी उद्वेगाची ॥ ६॥
कन्या उपवरी जाल्या । पुत्रास नोवऱ्या आल्या ।
आतां उजवणी केल्या । पाहिजेत कीं ॥ ७॥
जरी मुलें तैसींच राहिलीं । तरी पुन्हां लोकलाज जाली ।
म्हणती कासया व्यालीं । जन्मदारिद्र्यें ॥ ८॥
ऐसी लोकलाज होईल । वडिलांचें नांव जाईल ।
आतां रुण कोण देईल । लग्नापुरतें ॥ ९॥
मागें रुण ज्याचें घेतलें । त्याचें परतोन नाहीं दिल्हें ।
ऐसें आभाळ कोंसळलें । उद्वेगाचें ॥ १०॥
आपण खातों अन्नासी । अन्न खातें आपणासीं ।
सर्वकाळ मानसीं । चिंतातुर ॥ ११॥
पती अवघीच मोडली । वस्तभाव गाहाण पडिली ।
अहा देवा वेळ आली । आतां डिवाळ्याची ॥ १२॥
कांहीं केला ताडामोडा । विकिला घरींचा पाडारेडा ।
कांहीं पैका रोकडा । कळांतरें काढिला ॥ १३॥
ऐसें रुण घेतलें । लोकिकीं दंभ केलें ।
सकळ म्हणती नांव राखिलें । वडिलांचें ॥ १४॥
ऐसें रुण उदंड जालें । रिणाइतीं वेढून घेतलें ।
मग प्रयाण आरंभिलें । विदेशाप्रती ॥ १५॥
दोनी वरुषें बुडी मारिली । नीच सेवा अंगीकारिली ।
शरीरें आपदा भोगिली । आतिशयेंसीं ॥ १६॥
कांहीं मेळविलें विदेशीं । जीव लागला मनुष्यांपासीं ।
मग पुसोनियां स्वामीसी । मुरडता जाला ॥ १७॥
तंव तें अत्यंत पीडावलीं । वाट पाहात बैसलीं ।
म्हणती दिवसगती कां लागली । काये कारणें देवा ॥ १८॥
आतां आम्ही काये खावें । किती उपवासीं मरावें ।
ऐसियाचे संगतीस देवें । कां पां घातलें आम्हांसी ॥ १९॥
ऐसें आपुलें सुख पाहाती । परी त्याचें दुःख नेणती ।
आणी शक्ती गेलियां अंतीं । कोणीच कामा न येती ॥ २०॥
असो ऐसी वाट पाहातां । दृष्टीं देखिला अवचिता ।
मुलें धावती, ताता । भागलास म्हणौनी ॥ २१॥
स्त्री देखोन आनंदली । म्हणे आमुची दैन्यें फिटली ।
तंव येरें दिधली । गांठोडी हातीं ॥ २२॥
सकळांस आनंद जाला । म्हणती आमुचा वडील आला ।
तेणें तरी आम्हांला । आंग्या टोप्या आणिल्या ॥ २३॥
ऐसा आनंद च्यारी दिवस । सवेंच मांडिली कुसमुस ।
म्हणती हें गेलियां आम्हांस । पुन्हां आपदा लागती ॥ २४॥
म्हणौनी आणिलें तें असावें । येणें मागुतें विदेशास जावें ।
आम्ही हें खाऊं न तों यावें । द्रव्य मेळऊन ॥ २५॥
ऐसी वासना सकळांची । अवघीं सोईरीं सुखाचीं ।
स्त्री अत्यंत प्रीतीची । तेहि सुखाच लागली ॥ २६॥
विदेसीं बहु दगदला । विश्रांती घ्यावया आला ।
स्वासहि नाहीं टाकिला । तों जाणें वोढवलें ॥ २७॥
पुढें अपेक्षा जोसियांची । केली विवंचना मुहूर्ताची ।
वृत्ति गुंतली तयाची । जातां प्रशस्त न वटे ॥ २८॥ var वाटे
माया मात्रा सिद्ध केली । कांहीं सामग्री बांधली ।
लेंकुरें दृष्टीस पाहिलीं । मार्गस्त जाला ॥ २९॥
स्त्रियेस अवलोकिलें । वियोगें दुःख बहुत वाटलें ।
प्रारब्धसूत्र तुकलें । रुणानबंधाचें ॥ ३०॥
कंठ सद्गदित जाला । न संवरेच गहिवरला ।
लेंकुरा आणी पित्याला । तडातोडी जाली ॥ ३१॥
जरी रुणानुबंध असेल । तरी मागुती भेटी होईल ।
नाहीं तरी संगती पुरेल । येचि भेटीनें तुमची ॥ ३२॥
ऐसें बोलोन स्वार होये । मागुता फीरफिरों पाहे ।
वियोगदुःख न साहे । परंतु कांहीं न चले ॥ ३३॥
आपुला गांव राहिला मागें । चित्त भ्रमलें संसारउद्वेगें ।
दुःखवला प्रपंचसंगें । अभिमानास्तव ॥ ३४॥
ते समई माता आठवली । म्हणे धन्य धन्य ते माउली ।
मजकारणें बहुत कष्टली । परी मी नेणेंचि मूर्ख ॥ ३५॥
आजी जरी ते असती । तरी मजला कदा न विशंभती ।

वियोग होतां आक्रंदती । ते पोटागि वेगळीच ॥ ३६ ॥
पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगिकारी ।
दगदला देखोन अंतरीं । त्याच्या दुःखें दुःखवे ॥ ३७ ॥
प्रपंच विचारें पाहातां । हें सकळ जोडे न जोडे माता ।
हें शरीर जये करितां । निर्माण जालें ॥ ३८ ॥
लांव तरी ते माया । काय कराविया सहस्र जाया ।
परी भुलोन गेलों वायां । मकरध्वजाचेनी ॥ ३९ ॥
या येका कामाकारणें । जिवलगांसिं द्वंद घेणें ।
सखीं तींच पिसुणें । ऐसीं वाटतीं ॥ ४० ॥
म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन । जे मायेबापाचें भजन ।
करिती न करिती, मन- । निष्ठुर जिवलगांसीं ॥ ४१ ॥
संगती स्त्रीबाळकाची । आहे साठी जन्माची ।
परी मायेबापें कैंचीं । मिळतील पुढें ॥ ४२ ॥
ऐसें पूर्वीं होतें ऐकिलें । परी ते समई नाहीं कळलें ।
मन हें बुडोन गेलें । रतिसुखाचा डोहीं ॥ ४३ ॥
हे सखीं वाटती परी पिसुणें । मिळाली वैभवाकारणें ।
रितें जातां लाजिरवाणें । अत्यंत वाटे ॥ ४४ ॥
आता भलतैसें करावें । परि द्रव्य मेळऊन न्यावें ।
रितें जातां स्वभावें । दुःख आहे ॥ ४५ ॥
ऐसी वेवर्धना करी । दुःख वाटलें अंतरीं ।
चिंतेचिये माहापुरीं । बुडोन गेला ॥ ४६ ॥
ऐसा हा देह आपुला । असतांच पराधेन केला ।
ईश्वरीं कानकोंडा जाला । कुटुंबकाबाडी ॥ ४७ ॥
या येका कामासाठीं । जन्म गेला आटाटी ।
वय वेचल्यां सेवटीं । येकलेंचि जावें ॥ ४८ ॥
ऐसा मनीं प्रस्तावला । क्षण येक उदास जाला ।
सवेंचि प्राणी झळंबला । मायाजाळें ॥ ४९ ॥
कन्यापुत्रें आठवलीं । मनींहुनि क्षिती वाटली ।
म्हणे लेंकुरें अंतरलीं । माझीं मज ॥ ५० ॥
मागील दुःख आठवलें । जें जें होतें प्राप्त जालें ।
मग रुदन आरंभिलें । दीर्घ स्वरें ॥ ५१ ॥
आरुण्यरुदन करितां । कोणी नाहीं बुझाविता ।
मग होये विचारिता । आपुले मनीं ॥ ५२ ॥
आतां कासया रडावें । प्राप्त होतें तें भोगावें ।
ऐसे बोलोनिया जीवें । धारिष्ट केलें ॥ ५३ ॥
ऐसा दुःखें दगदला । मग विदेशाप्रती गेला ।
पुढे प्रसंग वर्तला । तो सावध ऐका ॥ ५४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम
समास चवथा ॥ ४ ॥ ३.४

समास पांचवा : स्वगुणपरीक्षा
॥ श्रीराम ॥
पुढें गेला विदेशासी । प्राणी लागला व्यासंगासी ।
आपल्या जिवेसीं सोसी । नाना श्रम ॥ १ ॥
ऐसा दुस्तर संसार । करितां कष्टला थोर ।
पुढें दोनी च्यारी संवत्सर । द्रव्य मेळविलें ॥ २ ॥
सवेंचि आला देशासी । तों आवर्षण पडिलें देसीं ।
तेणें गुणें मनुष्यांसी । बहुत कष्ट जाले ॥ ३ ॥
येकांच्या बैसल्या अमृतकळा । येकांस चंद्री लागली डोळां ।
येकें कांपती चळचळा । दैन्यवाणीं ॥ ४ ॥
येकें दीनरूप बैसलीं । येकें सुजलीं येकें मेलीं ।
ऐसीं कन्यापुत्रें देखिलीं । अकस्मात डोळां ॥ ५ ॥
तेणें बहुत दुःखी जाला । देखोनिया उभड आला ।
प्राणी आक्रंदों लागला । दैन्यवाणा ॥ ६ ॥
तंव तीं अवघीं सावध जालीं । म्हणती बाबा बाबा
जेऊं घाली ।
अन्नालागीं मिडकलीं । झडा घालिती ॥ ७ ॥
गांठोडें सोडून पाहाती । हातां पडिलें तेंचि खाती ।
कांहीं तोंडीं कांहीं हातीं । प्राण जाती निघोनी ॥ ८ ॥
तांतडी तांतडी जेऊं घाली । तों तें जेवितां
जेवितां कांहीं मेलीं ।
कांहीं होतीं धादावलीं । तेंहि मेलीं अजीर्णें ॥ ९ ॥
ऐसीं बहुतेकें मेलीं । येक दोनीं मुलें उरलीं ।
तेंहि दैन्यवाणीं जालीं । आपलें मातेवांचुनी ॥ १० ॥
ऐसे आवर्षण आलें । तेणें घरचि बुडालें ।
पुढें देसीं सुभिक्ष जालें । आतिशयेंसी ॥ ११ ॥
लेकुरां नाहीं वाढवितें । अन्न करावें लागे आपुलेन हातें ।
बहु त्रास घेतला चित्तें । स्वयंपाकाचा ॥ १२ ॥
लोकीं भरीस घातलें । पुन्हां मागुतें लग्न केलें ।
द्रव्य होतें तें वेचलें । लग्नाकारणें ॥ १३ ॥
पुन्हां विदेशासी गेला । द्रव्य मेळऊन आला ।
तव घरीं कळहो लागला । सावत्र पुत्रांसी ॥ १४ ॥
स्त्री जाली न्हातीधुती । पुत्र देखों न सकती ।
भ्रताराची गेली शक्ती । वृद्ध जाला ॥ १५ ॥
सदा भांडण पुत्रांचें । कोणी नायकती कोणाचें ।
वनिता अति प्रीतीचें । प्रीतिपात्र ॥ १६ ॥
किंत बैसला मनां । येके ठाई पडेना ।
म्हणोनियां पांचा जणा । मेळविलें ॥ १७ ॥
पांच जण वांटे करिती । तों ते पुत्र नायेकती ।
निवाडा नव्हेचि अंतीं- । भांडण लागलें ॥ १८ ॥
बापलेकां भांडण जालें । लेंकीं बापास मारिलें ।
तंव ते मातेनें घेतलें । शंखतीर्थ ॥ १९ ॥
ऐकोनि मिळाले लोक । उभे पाहाती कौतुक ।
म्हणती बापास लेक । कामा आले ॥ २० ॥
ज्या कारणें केले नवस । ज्या कारणें केले सायास ।
ते पुत्र पितीयास । मारिती पहा ॥ २१ ॥
ऐसी आली पापकळी । आश्चिर्य मानिलें सकळीं ।

उभे तोडिती कळी । नगरलोक ॥ २२ ॥
पुढें बैसोन पांच जण । वांटे केले तत्समान ।
बापलेंकांचें भांडण । तोडिलें तेहीं ॥ २३ ॥
बापास वेगळें घातलें । कोंपट बांधोन दिधलें ।
मन कांतेचें लागलें । स्वार्थबुद्धी ॥ २४ ॥
कांता तरुण पुरुष वृद्ध । दोघांस पडिला संमंध ।
खेद सांडून आनंद । मानिला तेहीं ॥ २५ ॥
स्त्री सांपडली सुंदर । गुणवंत आणी चतुर ।
म्हणे माझें भाग्य थोर । वृद्धपणीं ॥ २६ ॥
ऐसा आनंद मानिला । दुःख सर्वही विसरला ।
तंव तो गल्बला जाला । परचक्र आलें ॥ २७ ॥
अकस्मात धाडी आली । कांता बंदीं धरून नेली ।
वस्तभावही गेली । प्राणीयाची ॥ २८ ॥
तेणें दुःख जालें भारीं । दीर्घ स्वरें रुदन करी ।
मनीं आठवे सुंदरी । गुणवंत ॥ २९ ॥
तंव तिची वार्ता आली । तुमची कांता भ्रष्टली ।
ऐकोनियां आंग घाली । पृथ्वीवरी ॥ ३० ॥
सव्य अपसव्य लोळे । जळें पाझरती डोळे ।
आठवितां चित्त पोळे । दुःखानळें ॥ ३१ ॥
द्रव्य होतें मेळविलें । तेंही लग्नास वेचलें ।
कांतेसिही धरून नेलें । दुराचारी ॥ ३२ ॥
मजही वृद्धाप्य आलें । लेंकीं वेगळें घातलें ।
अहा देवा वोढवलें । अदृष्ट माझें ॥ ३३ ॥
द्रव्य नाहीं कांता नाहीं । ठाव नाहीं शक्ति नाहीं ।
देवा मज कोणीच नाहीं । तुजवेगळें ॥ ३४ ॥
पूर्वी देव नाहीं पुजिला । वैभव देखोन भुलला ।
सेखीं प्राणी प्रस्तावला । वृद्धपणीं ॥ ३५ ॥
देह अत्यंत खंगलें । सर्वांग वाळोन गेलें ।
वातपीत उसळलें । कंठ दाटला कफें ॥ ३६ ॥
वळे जिव्हेची बोबडी । कफें कंठ घडघडी ।
दुर्गंधी सुटली तोंडीं । नाकीं स्लेष्मा वाहे ॥ ३७ ॥
मान कांपे चळचळां । डोळे गळती भळभळां ।
वृद्धपणीं अवकळा । ठाकून आली ॥ ३८ ॥
दंतपाटी उखळली । तेणें बोचरखिंडी पडिली ।
मुखीं लाळ गळों लागली । दुर्गंधीची ॥ ३९ ॥
डोळां पाहातां दिसेना । कानीं शब्द ऐकेना ।
दीर्घ स्वरें बोलवेना । दमा दाटे ॥ ४० ॥
शक्ती पायांची राहिली । बैसवेना मुरुकुंडी घाली ।
बृहती वाजों लागली । तोंडाच ऐसी ॥ ४१ ॥
क्षुधा लागतां आवरेना । अन्न समई मिळेना ।
मिळालें तरी चावेना । दांत गेले ॥ ४२ ॥
पित्तें जिरेना अन्न । भक्षीतांच होये वमन ।
तैसेंचि जाये निघोन । अपानद्वारें ॥ ४३ ॥
विष्टा मूत्र आणि बळस । भोवता वमनें केला नास ।
दुरून जातां कोंडे स्वास । विश्वजनाचा ॥ ४४ ॥
नाना दुःखें नाना व्याधी । वृद्धपणीं चळे बुद्धी ।
तऱ्हीं पुरेना आवधी । आयुष्याची ॥ ४५ ॥
पापण्या भवयाचे केंश । पिकोन झडले निःशेष ।
सर्वांगीं लोंबलें मांस । चिरकुटासारिखें ॥ ४६ ॥
देह सर्व पारिखें जालें । सवंगडे निःशेष राहिले ।
सकळ प्राणीमात्र बोले । मरेना कां ॥ ४७ ॥
जें जन्मून पोसलीं । तेंचि फिरोन पडिलीं ।
अंतीं विषम वेळ आली । प्राणीयासी ॥ ४८ ॥
गेलें तारुण्य गेलें बळ । गेलें संसारीचें सळ ।
वाताहात जालें सकळ । शरीर आणी संपत्ती ॥ ४९ ॥
जन्मवरी स्वार्थ केला । तितुकाहि वेर्थ गेला ।
कैसा विषम काळ आला । अंतकाळीं ॥ ५० ॥
सुखाकारणें झुरला । सेखीं दुःखें कष्टी जाला ।
पुढें मागुता धोका आला । येमयातनेचा ॥ ५१ ॥
जन्म अवघा दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ ।
म्हणोनियां तत्काळ । स्वहित करावें ॥ ५२ ॥
असो ऐसें वृद्धपण । सकळांस आहे दारुण ।
म्हणोनियां शरण । भगवंतास जावें ॥ ५३ ॥
पुढें वृद्धीस तत्वतां । गर्भीं प्रस्तावा होता ।
तोचि आला मागुता । अंतकाळीं ॥ ५४ ॥
म्हणौनि मागुतें जन्मांतर । प्राप्त मातेचें उदर ।
संसार हा अति दुस्तर । तोचि ठाकून आला ॥ ५५ ॥
भगवद्भजनावांचुनी । चुकेना हे जन्मयोनि ।
तापत्रयांची जाचणी । सांगिजेल पुढे ॥ ५६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम
समास पांचवा ॥ ५ ॥ ३.५

समास सहावा : आध्यात्मिक ताप

॥ श्रीराम ॥

तापत्रयाचें लक्षण । आतां सांगिजेल निरूपण ।
श्रोतीं करावें श्रवण । येकाग्र होऊनी ॥ १ ॥
जो तापत्रैं पोळला । तो संतसंगें निवाला ।
आर्तभूत तोषला । पदार्थ जेवी ॥ २ ॥
क्षुधाक्रांतास मिळे अन्न । तृषाक्रांतास जीवन ।
बंदीं पडिल्याचें बंधन- । तोडितां, सुख ॥ ३ ॥
माहापुरें जाजावला । तो पैलतीरास नेला ।
कां तो स्वप्नींचा चेइला । स्वप्नदुःखी ॥ ४ ॥
कोणी येकासी मरण- । येतां, दिलें जीवदान ।
संकटास निवारण । तोडितां सुख ॥ ५ ॥
रोगियास औषध । सप्रचित आणी शुद्ध ।
तयासी होये आनंद । आरोग्य होतां ॥ ६ ॥
तैसा संसारें दुःखवला । त्रिविधतापें पोळला ।

तोचि येक अधिकारी जाला । परमार्थासी ॥ ७॥
ते त्रिविध ताप ते कैसे । आतां बोलिजेत तैसे ।
येविषई येक असे । वाक्याधार ॥ ८ ॥
श्लोक ॥ देहेंद्रियप्राणेन सुखं दुःखं च प्राप्यते ।
इममाध्यात्मिकं तापं जायते दुःख देहिनाम् ॥ १॥
सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते ।
द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ॥ २॥
शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना ।
स्वर्गनरकादिं भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम् ॥ ३॥
येक ताप आध्यात्मिक । दुजा तो आदिभूतिक ।
तिसरा आदिदैविक । ताप जाणावा ॥ ९ ॥
आध्यात्मिक तो कोण । कैसी त्याची वोळखण ।
आदिभूतिकांचें लक्षण । जाणिजे कैसें ॥ १०॥
आदिदैविक तो कैसा । कवण तयाची दशा ।
हेंहि विशद कळे ऐसा । विस्तार कीजे ॥ ११॥
हां जी म्हणोनि वक्ता । जाला कथा विस्तारिता ।
आध्यात्मिक ताप आतां । सावध ऐका ॥ १२॥
देह इंद्रिय आणी प्राण । यांचेनि योगें आपण ।
सुखदुःखें सिणे जाण । या नांव आध्यात्मिक ॥ १३॥
देहामधून जें आलें । इंद्रियें प्राणें दुःख जालें ।
तें आध्यात्मिक बोलिलें । तापत्रई ॥ १४॥
देहामधून काये आलें । प्राणें कोण दुःख जालें ।
आतां हें विशद केलें । पाहिजे कीं ॥ १५॥
खरुज खवडे पुळिया नारु । नखरुडें मांजऱ्या देवि गोवरु ।
देहामधील विकारु । या नांव आध्यात्मिक ॥ १६॥
काखमांजरी केशतोड । वोखटें वर्ण काळफोड ।
व्याधी मूळव्याधी माहाजड । या नांव आध्यात्मिक ॥ १७॥
अंगुळवेडे गालफुगी । कंड लागे वाउगी ।
हिरडी सुजे भरे बलंगी । या नांव आध्यात्मिक ॥ १८॥
वाउगे फोड उठती । कां ते सुजे आंगकांती ।
वात आणी तिडका लागती । या नांव आध्यात्मिक ॥ १९॥
नाइटे अंदु गजकर्ण । पेहाचे पोट विस्तीर्ण ।
बैसलें टाळें फुटती कर्ण । या नांव आध्यात्मिक ॥ २०॥
कुष्ट आणि वोला कुष्ट । पंड्यारोग अतिश्रेष्ठ ।
क्षयरोगाचे कष्ट । या नांव आध्यात्मिक ॥ २१॥
वाटी वटक वायेगोळा । हातीं पाई लागती कळा ।
भोवंडी लागे वेळोवेळां । या नांव आध्यात्मिक ॥ २२॥
वोलांडा आणी वळ । पोटसुळाची तळमळ ।
आर्धशिसी उठे कपाळ । या नांव आध्यात्मिक ॥ २३॥
दुःखे माज आणि मान । पुष्टी ग्रीवा आणि वदन ।
अस्तिसांदे दुःखती जाण । या नांव आध्यात्मिक ॥ २४॥
कुळिक तरळ कामिणी । मुरमा सुंठरें माळिणी ।
विदेसीं लागलें पाणी । या नांव आध्यात्मिक ॥ २५॥
जळसोस आणी हिवारें । गिरीविरी आणी अंधारें ।
ज्वर पाचाव आणी शारें । या नांव आध्यात्मिक ॥ २६॥
शैत्य उष्ण आणी तृषा । क्षुधा निद्रा आणी दिशा ।
विषयतृष्णेची दुर्दशा । या नांव आध्यात्मिक ॥ २७॥
आळसी मूर्ख आणी अपेसी । भय उद्भवे मानसीं ।
विसराळु दुश्चित्त आहिर्निशी । या नांव आध्यात्मिक ॥ २८॥
मूत्रकोड आणी परमें । रक्तपिती रक्तपरमें ।
खडाचढाचेनि श्रमे । या नांव आध्यात्मिक ॥ २९॥
मुरडा हागवण उन्हाळे । दिशा कोंडतां आंदोळे ।
येक वेथा असोन न कळे । या नांव आध्यात्मिक ॥ ३०॥
गांठी ढळली जाले जंत । पडे आंव आणी रक्त ।
अन्न तैसेचि पडत । या नांव आध्यात्मिक ॥ ३१॥
पोटफुगी आणी तडस । भरला हिर लागला घांस ।
फोडी लागतां कासावीस । या नांव आध्यात्मिक ॥ ३२॥
उचकी लागली उसित गेला । पीत उसळलें उलाट जाला ।
खरे पडसा आणी खोंकला । या नांव आध्यात्मिक ॥ ३३॥
उसळला दमा आणी धाप । पडजिभ ढासि आणी कफ ।
मोवाज्वर आणी संताप । या नांव आध्यात्मिक ॥ ३४॥
कोणी सेंदूर घातला । तेणें प्राणी निर्बुजला ।
घशामध्ये फोड जाला । या नांव आध्यात्मिक ॥ ३५॥
गळसोव्या आणी जीभ झडे । सदा मुखीं दुर्गंधी पडे ।
दंतहीन लागती किडे । या नांव आध्यात्मिक ॥ ३६॥
जरंडी घोलाणा गंडमाळा । अवचिता स्वयें फुटे डोळा ।
आपणचि कापी अंगुळा । या नांव आध्यात्मिक ॥ ३७॥
कळा तिडका लागती । कां ते दंत उन्मळती ।
अधर जिव्हा रगडती । या नांव आध्यात्मिक ॥ ३८॥
कर्णदुःख नेत्र दुःख । नाना दुःखें घडे शोक ।
गर्भांध आणी नपुंश्यक । या नांव आध्यात्मिक ॥ ३९॥
फुलें वडस आणी पडळें । कीड गर्ता रातांधळें ।
दुश्चित्त भ्रमिष्ट आणी खुळें । या नांव आध्यात्मिक ॥ ४०॥
मुकें बधीर राखोंडें । थोटें चळलें आणी वेडें ।
पांगुळ कुहें आणी पावडे । या नांव आध्यात्मिक ॥ ४१॥
तारसें घुलें काणें कैरें । गारोळें जामुन टाफरें ।
शडांगुळें गेंगाणें विदरें । या नांव आध्यात्मिक ॥ ४२॥
दांतिरें बोचिरें घानाळ । घ्राणहीन श्रोत्रहीन बरळ ।
अति कृश अति स्थूळ । या नांव आध्यात्मिक ॥ ४३॥
तोंतरें बोंबडें निर्बळ । रोगी कुरूप कुटीळ ।
मत्सरी खादाड तपीळ । या नांव आध्यात्मिक ॥ ४४॥
संतापी अनुतापी मत्सरी । कामिक हेवा तिरस्कारी ।
पापी अवगुणी विकारी । या नांव आध्यात्मिक ॥ ४५॥
उठवणें ताठा करक । आवटळे आणी लचक ।
सुजी आणी चालक । या नांव आध्यात्मिक ॥ ४६॥
सल आडवें गर्भपात । स्तनगुंते सनपात ।

संसारकोंडे आपमृत्य । या नांव आध्यात्मिक ॥ ४७॥
नखविख आणी हिंगुर्डें । बाष्ट आणी वावडें ।
उगीच दांतखीळ पडे । या नांव आध्यात्मिक ॥ ४८॥
झडती पातीं सुजती भवया । नेत्रीं होती राझणवडीया ।
चाळसी लागे प्राणियां । या नांव आध्यात्मिक ॥ ४९॥
वांग तिळ सुरमें लांसें । चामखिळ गलंडे मसें ।
चुकुर होइजे मानसें । या नांव आध्यात्मिक ॥ ५०॥
नाना फुग आणी आवाळें । आंगीं दुर्गंधी प्रबळे ।
चाईचाटी लाळ गळे । या नांव आध्यात्मिक ॥ ५१॥
नाना चिंतेची काजळी । नाना दुःखें चित्त पोळी ।
व्याधीवांचून तळमळी । या नांव आध्यात्मिक ॥ ५२॥
वृद्धपणीच्या आपदा । नाना रोग होती सदा ।
देह क्षीण सर्वदा । या नांव आध्यात्मिक ॥ ५३॥
नाना व्याधी नाना दुःखें । नाना भोग नाना खांडकें ।
प्राणी तळमळी शोकें । या नांव आध्यात्मिक ॥ ५४॥
ऐसा आध्यात्मिक ताप । पूर्वपापाचा संताप ।
सांगतां सरेना अमूप । दुःखसागर ॥ ५५॥
बहुत काय बोलावें । श्रोतीं संकेतें जाणावें ।
पुढें बोलिजे स्वभावें । आदिभूतिक ॥ ५६॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आध्यात्मिकतापनिरूपणनाम
समास सहावा ॥ ६॥ ३.६

समास सातवा : आधिभूतिक ताप

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । आध्यात्मिकाचें लक्षण ।
आतां आदिभूतिक तो कोण । सांगिजेल ॥ १॥
श्लोक ॥ सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते ।
द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ॥
सर्व भूतांचेनि संयोगें । सुखदुःख उपजों लागे ।
ताप होतां मन भंगे । या नांव आदिभूतिक ॥ २॥
तरी या आदिभूतिकाचें लक्षण । प्रांजळ करूं निरूपण ।
जेणें अनुभवास ये पूर्ण । वोळखी तापत्रयाची ॥ ३॥
ठेंचा लागती मोडती कांटे । विझती शस्त्रांचे धायटे ।
सल सिलका आणी सरांटे । या नांव आदिभूतिक ॥ ४॥
अंग्या आणी काचकुहिरी । आवचटा लागे शरीरीं ।
गांधील येऊन दंश करी । या नांव आदिभूतिक ॥ ५॥
मासी गोमासी मोहळमासी । मुंगी तेलमुंगी डांस दसी ।
सोट जळू लागे यासी । आदिभूतिक बोलिजे ॥ ६॥
पिसा पिसोळे चांचण । कुसळें मुंगळे ढेंकुण ।
विसीफ भोवर गोंचिड जाण । या नांव आदिभूतिक ॥ ७॥
गोंबी विंचु आणी विखार । व्याघ्र लांडिगे आणी शूकर ।
गौसायळ सामर । या नांव आदिभूतिक ॥ ८॥
रानगाई रानम्हैसे । रानशकट्ट आणी रीसें ।
रानहाती लांवपिसें । या नांव आदिभूतिक ॥ ९॥
सुसरीनें वोढून नेलें । कां तें आवचितें बुडालें ।
आथवा खळाळीं पडिलें । या नांव आदिभूतिक ॥ १०॥
नाना विखारें आजगर । नाना मगरें जळचर ।
नाना वनचरें अपार । या नांव आदिभूतिक ॥ ११॥
अश्व वृषभ आणी खर । स्वान शूकर जंबुक मार्जर ।
ऐसीं बहुविध क्रूर । या नांव आदिभूतिक ॥ १२॥
ऐसीं कर्कशें भयानकें । बहुविध दुःखदायकें ।
दुःखें दारुणें अनेकें । या नांव आदिभूतिक ॥ १३॥
भिंती माळवंदे पडती । कडे भुयेरीं कोंसळती ।
वृक्ष आंगावरी मोडती । या नांव आदिभूतिक ॥ १४॥
कोणी येकाचा श्राप जडे । कोणी येकें केले चेडे ।
आधांतरी होती वेडे । या नांव आदिभूतिक ॥ १५॥
कोणी येकें चाळविलें । कोणी येकें भ्रष्टविले ।
कोणी येकें धरून नेलें । या नांव आदिभूतिक ॥ १६॥
कोणी येकें दिलें वीष । कोणी येकें लाविले दोष ।
कोणी येकें घातलें पाश । या नांव आदिभूतिक ॥ १७॥
अवचिता सेर लागला । नेणो बिबवा चिडला ।
प्राणी धुरें जाजावला । या नांव आदिभूतिक ॥ १८॥
इंगळावरी पाय पडे । शिळेखालें हात सांपडे ।
धावतां आडखुळे पडे । या नांव आदिभूतिक ॥ १९॥
वापी कूप सरोवर । गर्ता कडा नदीतीर ।
आवचितें पडे शरीर । या नांव आदिभूतिक ॥ २०॥
दुर्गाखालें कोंसळती । झाडावरून पडती ।
तेणें दुःखें आक्रंदती । या नांव आदिभूतिक ॥ २१॥
सीतें वोठ तरकती । हात पाव टांका फुटती ।
चिखल्या जिव्हाळ्या लागती । या नांव आदिभूतिक ॥ २२॥
अशनपानाचिये वेळे । उष्ण रसें जिव्हा पोळे ।
दांत कस्करे आणी हरळे । या नांव आदिभूतिक ॥ २३॥
पराधेन बाळपणीं । कुशब्दमारजाचणी ।
अन्नवस्त्रेंवीण आळणी । या नांव आदिभूतिक ॥ २४॥
सासुरवास गालोरे । ठुणके लासणें चिमोरे ।
आलें रुदन न धरे । या नांव आदिभूतिक ॥ २५॥
चुकतां कान पिळिती । कां तो डोळा हिंग घालिती ।
सर्वकाळ धारकीं धरिती । या नांव आदिभूतिक ॥ २६॥
नाना प्रकारीचे मार । दुर्जन मारिती अपार ।
दुरी अंतरे माहेर । या नांव आदिभूतिक ॥ २७॥
कर्णनासिक विंधिलें । बळेंचि धरून गोंधिलें ।
खोडी जालिया पोळविलें । या नांव आदिभूतिक ॥ २८॥
परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें ।
दुर्दशा होऊन मेलें । या नांव आदिभूतिक ॥ २९॥
नाना रोग उद्भवले । जे आध्यात्मिकीं बोलिले ।
वैद्य पंचाक्षरी आणिले । या नांव आदिभूतिक ॥ ३०॥
नाना वेथेचें निर्शन । व्हावया औषध दारुण ।

बळात्कारें देती जाण । या नांव आदिभूतिक ॥ ३१॥
नाना वल्लीचे रस । काडे गर्गोंड कर्कश ।
घेतां होये कासावीस । या नांव आदिभूतिक ॥ ३२॥
ढाळ आणी उखाळ देती । पथ्य कठीण सांगती ।
अनुपान चुकतां विपत्ती । या नांव आदिभूतिक ॥ ३३॥
फाड रक्त फांसणी । गुल्लडागांची जाचणी ।
तेणें दुःखें दुःखवे प्राणी । या नांव आदिभूतिक ॥ ३४॥
रुचिक बिबवे घालिती । नाना दुःखें दडपे देती ।
सिरा तोडिती जळा लाविती । या नांव आदिभूतिक ॥३५॥ var जळवा
बहु रोग बहु औषधें । सांगतां अपारें अगाधें ।
प्राणी दुखवे तेणें खेदें । या नांव आदिभूतिक ॥ ३६॥
बोलाविला पंचाक्षरी । धूरमार पीडा करी ।
नाना यातना चतुरीं । आदिभूतिक जाणिजे ॥ ३७॥
दरवडे घालूनियां जना । तश्कर करिती यातना ।
तेणें दुःख होये मना । या नांव आदिभूतिक ॥ ३८॥
अग्नीचेनि ज्वाळें पोळे । तेणें दुःखें प्राणी हरंबळे ।
हानी जालियां विवळे । या नांव आदिभूतिक ॥ ३९॥
नाना मंदिरें सुंदरें । नाना रत्नांचीं भांडारें ।
दिव्यांबरें मनोहरें । दग्ध होती ॥ ४०॥
नाना धान्यें नाना पदार्थ । नाना पशु नाना स्वार्थ ।
नाना पात्रें नाना अर्थ । मनुष्यें भस्म होती ॥ ४१॥
आग्न लागला सेती । धान्यें बणव्या आणी खडकुती ।
युक्षदंड जळोन जाती । अकस्मात ॥ ४२॥
ऐसा आग्न लागला । अथवा कोणी लाविला ।
हानी जाली कां पोळला । या नांव आदिभूतिक ॥ ४३॥
ऐसें सांगतां बहुत । होती वन्हीचे आघात ।
तेणे दुःखें दुःखवे चित्त । या नांव आदिभूतिक ॥ ४४॥
हारपे विसरे आणी सांडे । नासे गाहाळ फुटे पडे ।
असाध्य होये कोणीकडे । या नांव आदिभूतिक ॥ ४५॥
प्राणी स्थानभ्रष्ट जालें । नाना पशूतें चुकलें ।
कन्यापुत्र गाहाळले । या नांव आदिभूतिक ॥ ४६॥
तश्कर अथवा दावेदार । आवचितां करिती संव्हार ।
लुटिती घरें नेती खिल्लार । या नांव आदिभूतिक ॥ ४७॥
नाना धान्यें केळी कापिती । पानमळां मीठ घालिती ।
ऐसे नाना आघात करिती । या नांव आदिभूतिक ॥ ४८॥
मैंद उचले खाणोरी । सुवर्णपंथी भुररेकरी ।
ठकु सिंतरु वरपेकरी । वरपा घालिती ॥ ४९॥
गठीछोडे द्रव्य सोडिती । नाना आळंकार काढिती ।
नाना वस्तु मूषक नेती । या नांव आदिभूतिक ॥ ५०॥
वीज पडे हिंव पडे । प्राणी प्रजंनी सांपडे ।
कां तो माहापुरीं बुडे । या नांव आदिभूतिक ॥ ५१॥
भोवरें वळणें आणी धार । वोसाणें लाटा अपार ।
वृश्चिक गोंबी आजगर । वाहोन जाती ॥ ५२॥
तयामधें प्राणी सांपडला । खडकी बेटीं आडकला ।
बुडत बुडत वांचला । या नांव आदिभूतिक ॥ ५३॥
मनासारिखा नसे संसार । कुरूप कर्कश स्त्री क्रूर ।
विधवा कन्या मूर्ख पुत्र । या नांव आदिभूतिक ॥ ५४॥
भूत पिशाच्च लागलें । आंगावरून वारें गेलें ।
अबद्धमंत्रे प्राणी चळलें । या नांव आदिभूतिक ॥ ५५॥
ब्राह्मणसमंध शरीरीं । बहुसाल पीडा करी ।
शनेश्वराचा धोका धरी । या नांव आदिभूतिक ॥ ५६॥
नाना ग्रहे काळवार । काळतिथी घातचंद्र ।
काळवेळ घातनक्षत्र । या नांव आदिभूतिक ॥ ५७॥
सिंक पिंगळा आणी पाली । वोखटें होला काक कलाली ।
चिंता काजळी लागली । या नांव आदिभूतिक ॥ ५८॥
दिवटा सरवदा भाकून गेला । अंतरीं धोका लागला ।
दुःस्वप्नें जाजावला । या नांव आदिभूतिक ॥ ५९॥
भालु भुंके स्वान रडे । पाली अंगावरी पडे ।
नाना चिन्हें चिंता पवाडे । या नांव आदिभूतिक ॥ ६०॥
बाहेरी निघतां अपशकून । नाना प्रकारें विच्छिन्न ।
तेणें गुणें भंगे मन । या नांव आदिभूतिक ॥ ६१॥
प्राणी बंदी सांपडला । यातने वरपडा जाला ।
नाना दुःखें दुःखवला । या नांव आदिभूतिक ॥ ६२॥
प्राणी राजदंड पावत । जेरबंद चाबुक वेत ।
दरेमार तळवेमार होत । या नांव आदिभूतिक ॥ ६३॥
कोरडे पारंब्या फोक । बहुप्रकारें अनेक ।
बहुताडिती आदिभूतिक । या नांव बोलिजे ॥ ६४॥
मोघरीमार बुधलेमार । चौखुरून डंगारणेमार ।
बुक्या गचांड्या गुढघेमार । या नांव आदिभूतिक ॥ ६५॥
लाता तपराखा सेणमार । कानखडे दगडमार । var चतराखा
नाना प्रकारींचे मार । या नांव आदिभूतिक ॥ ६६॥
टांगणें टिपऱ्या पिछोडे । बेडी बुधनाल कोलदंडे ।
रक्षणनिग्रह चहूंकडे । या नांव आदिभूतिक ॥ ६७॥
नाकवणी चुनवणी । मीठवणी रायवणी ।
गुळवण्याची जाचणी । या नांव आदिभूतिक ॥ ६८॥
जळामध्यें बुचकळिती । हस्तीपुढें बांधोन टाकिती ।
हाकिती छळिती यातायाती । या नांव आदिभूतिक ॥ ६९॥
कर्णछेद घ्राणछेद । हस्तछेद पादछेद ।
जिव्हाछेद अधरछेद । या नांव आदिभूतिक ॥ ७०॥
तीरमार सुळीं देती । नेत्र वृषण काढिती ।
नखोनखीं सुया मारिती । या नांव आदिभूतिक ॥ ७१॥
पारड्यामध्यें घालणें । कां कडेलोट करणें ।
कां भांड्यामुखें उडवणें । या नांव आदिभूतिक ॥ ७२॥
कानीं खुंट्या आदळिती । अपानीं मेखा मारिती ।
खाल काढून टाकिती । या नांव आदिभूतिक ॥ ७३॥
भोत आणी बोटबोटी । अथवा गळ घालणें कंठीं ।

सांडस लावून आटाटी । या नांव आदिभूतिक ॥ ७४॥
सिसें पाजणें वीष देणें । अथवा सिरच्छेद करणें ।
कां पायातळीं घालणें । या नांव आदिभूतिक ॥ ७५॥
सरड मांजरें भरिती । अथवा फांसीं नेऊन देती ।
नानापरी पीडा करिती । या नांव आदिभूतिक ॥ ७६॥
स्वानप्रळये व्याघ्रप्रळये । भूतप्रळये सुसरीप्रळये ।
शस्त्रप्रळये विझप्रळये । या नांव आदिभूतिक ॥ ७७॥
सीरा वोढून घेती । टेंभें लाउन भाजिती ।
ऐशा नाना विपत्ती । या नांव आदिभूतिक ॥ ७८॥
मनुष्यहानी वित्तहानी । वैभवहानी महत्वहानी । var महत्त्व
पशुहानी पदार्थहानी । या नांव आदिभूतिक ॥ ७९॥
बाळपणीं मरे माता । तारुण्यपणीं मरे कांता ।
वृद्धपणीं मृत्य सुता । या नांव आदिभूतिक ॥ ८०॥
दुःख दारिद्र आणी रुण । विदेशपळणी नागवण ।
आपदा अनुपत्ति कदान्न । या नांव आदिभूतिक ॥ ८१॥
आकांत वाखाप्रळये । युध्य होतां पराजये ।
जिवलगांचा होये क्षये । या नांव आदिभूतिक ॥ ८२॥
कठीण काळ आणी दुष्काळ । साशंक आणी वोखटी वेळ ।
उद्वेग चिंतेचे हळाळ । या नांव आदिभूतिक ॥ ८३॥
घाणा चरखीं सिरकला । चाकाखालें सांपडला ।
नाना वन्हींत पडिला । या नांव आदिभूतिक ॥ ८४॥
नाना शस्त्रें भेदिला । नाना स्वापदीं भक्षिला ।
नाना बंदीं पडिला । या नांव आदिभूतिक ॥ ८५॥
नाना कुवासें निर्बुजे । नाना अपमानें लाजे ।
नाना शोकें प्राणी झिजे । या नांव आदिभूतिक ॥ ८६॥
ऐसें सांगतां अपार । आहेत दुःखाचे डोंगर ।
श्रोतीं जाणावा विचार । आदिभूतिकाचा ॥ ८७॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आदिभूतिकतापनिरूपणनाम
समास सातवा ॥ ७॥ ३.७

समास आठवा : आधिदैविक ताप
॥ श्रीराम ॥
मागां बोलिला आध्यात्मिक । त्याउपरीं आदिभूतिक ।
आतां बोलिजेल आदिदैविक । तो सावध ऐका ॥ १॥
श्लोक ॥ शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना ।
स्वर्गनरकादिभोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम् ॥
शुभाशुभ कर्मानें जना । देहांतीं येमयातना ।
स्वर्ग नर्क भोग नाना । या नांव आधिदैविक ॥ २॥
नाना दोष नाना पातकें । मदांधपणें अविवेकें ।
केलीं, परी तें दुःखदायकें । येमयातना भोगविती ॥ ३॥
आंगबळें द्रव्यबळें । मनुष्यबळें राजबळें ।
नाना सामर्थ्याचेनि बळें । अकृत्य करिती ॥ ४॥
नीती सांडूनियां तत्वतां । करूं नये तेंचि करितां ।
येमयातना भोगितां । जीव जाये ॥ ५॥
डोळे झांकून स्वार्थबुद्धीं । नाना अभिळाश कुबुद्धीं ।
वृत्ति भूमिसिमा सांधी । द्रव्य दारा पदार्थ ॥ ६॥
मातलेपणें उन्मत्त । जीवघात कुटुंबघात ।
अप्रमाण क्रिया करीत । म्हणौन येमयातना ॥ ७॥
मर्यादा सांडूनि चालती । ग्रामा दंडी ग्रामाधिपती ।
देशा दंडी देशाधिपती । नीतिन्याय सांडितां ॥ ८॥
देशाधिपतीस दंडिता रावो । रायास दंडिता देवो ।
राजा न करितां नीतिन्यावो । म्हणौन यमयातना ॥ ९॥
अनीतीनें स्वार्थ पाहे । राजा पापी होऊन राहे ।
राज्याअंतीं नर्क आहे । म्हणौनियां ॥ १०॥
राजा सांडितां राजनीति । तयास येम गांजिती ।
येम नीति सांडितां धावती । देवगण ॥ ११॥
ऐसी मर्यादा लाविली देवें । म्हणौनि नीतीनें वर्तावें ।
नीति न्याय सांडितां भोगावें । येमयातनेसी ॥ १२॥
देवें प्रेरिले येम । म्हणौनि आदिदैविक नाम ।
तृतीय ताप दुर्गम । येमयातनेचा ॥ १३॥
येमदंड येमयातना । शास्त्रीं बोलिले प्रकार नाना ।
तो भोग कदापि चुकेना । या नांव आदिदैविक ॥ १४॥
येमयातनेचे खेद । शास्त्रीं बोलिले विशद ।
शेरीरीं घालून, अप्रमाद- । नाना प्रकारें ॥ १५॥
पापपुण्याचीं शरीरें । स्वर्गीं असती कळिवरें ।
त्यांत घालून नाना प्रकारें । पापपुण्य भोगविती ॥ १६॥
नाना पुण्यें विळास । नाना दोषें यातना कर्कश ।
शास्त्रीं बोलिलें अविश्वास- । मानूंच नये ॥ १७॥
वेदाज्ञेनें न चालती । हरिभक्ती न करिती ।
त्यास येमयातना करिती । या नांव आदिदैविक ॥ १८॥
अक्षोभ नर्कीं उदंड जीव । जुनाट किडे करिती रवरव ।
बांधोन टाकिती हातपाव । या नांव आदिदैविक ॥ १९॥
उदंड पैस लाहान मुख । कुंभाकार कुंड येक ।
दुर्गंधी उकाडा कुंभपाक । या नांव आदिदैविक ॥ २०॥
तप्तभूमिका ताविती । जळत स्थंभ पोटाळविती ।
नाना सांडस लाविती । या नांव आदिदैविक ॥ २१॥
येमदंडाचे उदंड मार । यातनेची सामग्री अपार ।
भोग भोगिती पापी नर । या नांव आदिदैविक ॥ २२॥
पृथ्वीमध्यें मार नाना । त्याहून कठीण येमयातना ।
मरितां उसंतचि असेना । या नांव आदिदैविक ॥ २३॥ var मारितां
चौघे चौंकडे वोढिती । येक ते झोंकून पाडिती ।
ताणिती मारिती वोढूनि नेती । या नांव आदिदैविक ॥ २४॥
उठवेना बसवेना । रडवेना पडवेना ।
यातनेवरी यातना । या नांव आदिदैविक ॥ २५॥
आक्रंदे रडे आणि फुंजे । धकाधकीनें निर्बुजे ।
झुर्झरों पंजर होऊन झिजे । या नांव आदिदैविक ॥ २६॥
कर्कश वचनें कर्कश मार । यातनेचे नाना प्रकार ।

त्रास पावती दोषी नर । या नांव आदिदैविक ॥ २७॥
मागां बोलिलां राजदंड । त्याहून येमदंड उदंड ।
तेथील यातना प्रचंड । भीमरूप दारुण ॥ २८ ॥
आध्यात्मिक आदिभूतिक । त्याहूनि विशेष आदिदैविक ।
अल्प संकेतें कांहींयेक । कळावया बोलिलें ॥ २९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आधिदैविकतापनिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥ ३.८

समास नववा : मृत्युनिरूपण
॥ श्रीराम ॥
संसार म्हणिजे सवेंच स्वार । नाहीं मरणास उधार ।
मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥
नित्य काळाची संगती । न कळे होणाराची गती ।
कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देसीं विदेसीं ॥ २ ॥
सरतां संचिताचें शेष । नाहीं क्षणाचा अवकाश ।
भरतां न भरतां निमिष्य । जाणें लागे ॥ ३ ॥
अवचितें काळाचे म्हणियारे । मारित सुटती येकसरें ।
नेऊन घालिती पुढारें । मृत्युपंथे ॥ ४ ॥
होतां मृत्याची आटाटी । कोणी घालूं न सकती पाठीं ।
सर्वत्रांस कुटाकुटी । मागेंपुढें होतसे ॥ ५ ॥
मृत्युकाळ काठी निकी । बैसे बळियाचे मस्तकीं ।
माहाराजे बळिये लोकीं । राहों न सकती ॥ ६ ॥
मृत्य न म्हणे किं हा क्रूर । मृत्य न म्हणे हा जुंझार ।
मृत्य न म्हणे संग्रामशूर । समरांगणीं ॥ ७ ॥
मृत्य न म्हणे किं हा कोपी । मृत्य न म्हणे हा प्रतापी ।
मृत्य न म्हणे उग्ररूपी । माहांखळ ॥ ८ ॥
मृत्य न म्हणे बलाढ्य । मृत्य न म्हणे धनाढ्य ।
मृत्य न म्हणे आढ्य । सर्व गुणें ॥ ९ ॥
मृत्य न म्हणे हा विख्यात । मृत्य न म्हणे हा श्रीमंत ।
मृत्य न म्हणे हा अद्भुत । पराक्रमी ॥ १० ॥
मृत्य न म्हणे हा भूपती । मृत्य न म्हणे हा चक्रवती ।
मृत्य न म्हणे हा करामती । कैवाड जाणे ॥ ११ ॥
मृत्य न म्हणे हा हयपती । मृत्य न म्हणे गजपती ।
मृत्य न म्हणे नरपती । विख्यात राजा ॥ १२ ॥
मृत्य न म्हणे वरिष्ठ जनीं । मृत्य न म्हणे राजकारणी ।
मृत्य न म्हणे वेतनी । वेतनधर्ता ॥ १३ ॥
मृत्य न म्हणे देसाई । मृत्य न म्हणे वेवसाई ।
मृत्य न म्हणे ठाई ठाई । पुंड राजे ॥ १४ ॥
मृत्य न म्हणे मुद्राधारी । मृत्य न म्हणे व्यापारी ।
मृत्य न म्हणे परनारी । राजकन्या ॥ १५ ॥
मृत्य न म्हणे कार्याकारण । मृत्य न म्हणे वर्णावर्ण ।
मृत्य न म्हणे हा ब्राह्मण । कर्मनिष्ठ ॥ १६ ॥
मृत्य न म्हणे वित्पन्न । मृत्य न म्हणे संपन्न ।
मृत्य न म्हणे विद्वज्जन । समुदाई ॥ १७ ॥
मृत्य न म्हणे हा धूर्त । मृत्य न म्हणे बहुश्रुत ।
मृत्य न म्हणे हा पंडित । माहाभला ॥ १८ ॥
मृत्य न म्हणे पुराणिक । मृत्य न म्हणे हा वैदिक ।
मृत्य न म्हणे हा याज्ञिक । अथवा जोसी ॥ १९ ॥
मृत्य न म्हणे अग्निहोत्री । मृत्य न म्हणे हा श्रोत्री ।
मृत्य न म्हणे मंत्रयंत्री । पूर्णागमी ॥ २० ॥
मृत्य न म्हणे शास्त्रज्ञ । मृत्य न म्हणे वेदज्ञ ।
मृत्य न म्हणे सर्वज्ञ । सर्व जाणे ॥ २१ ॥
मृत्य न म्हणे ब्रह्महत्या । मृत्य न म्हणे गोहत्या ।
मृत्य न म्हणे नाना हत्या । स्त्रीबाळकादिक ॥ २२ ॥
मृत्य न म्हणे रागज्ञानी । मृत्य न म्हणे ताळज्ञानी ।
मृत्य न म्हणे तत्वज्ञानी । तत्ववेत्ता ॥ २३ ॥
मृत्य न म्हणे योग्याभ्यासी । मृत्य न म्हणे संन्यासी ।
मृत्य न म्हणे काळासी । वंचूं जाणे ॥ २४ ॥
मृत्य न म्हणे हा सावध । मृत्य न म्हणे हा सिद्ध ।
मृत्य न म्हणे वैद्य प्रसिद्ध । पंचाक्षरी ॥ २५ ॥
मृत्य न म्हणे हा गोसावी । मृत्य न म्हणे हा तपस्वी ।
मृत्य न म्हणे हा मनस्वी । उदासीन ॥ २६ ॥
मृत्य न म्हणे ऋषेश्वर । मृत्य न म्हणे कवेश्वर ।
मृत्य न म्हणे दिगंबर । समाधिस्थ ॥ २७ ॥
मृत्य न म्हणे हठयोगी । मृत्य न म्हणे राजयोगी ।
मृत्य न म्हणे वीतरागी । निरंतर ॥ २८ ॥
मृत्य न म्हणे ब्रह्मच्यारी । मृत्य न म्हणे जटाधारी ।
मृत्य न म्हणे निराहारी । योगेश्वर ॥ २९ ॥
मृत्य न म्हणे हा संत । मृत्य न म्हणे हा महंत ।
मृत्य न म्हणे हा गुप्त । होत असे ॥ ३० ॥
मृत्य न म्हणे हा स्वाधेन । मृत्य न म्हणे हा पराधेन ।
सकळ जीवांस प्राशन । मृत्यचि करी ॥ ३१ ॥
येक मृत्युमार्गी लागले । येकीं आर्धपंथ क्रमिले ।
येक ते सेवटास गेले । वृद्धपणीं ॥ ३२ ॥
मृत्य न म्हणे बाळ तारुण्य । मृत्य न म्हणे सुलक्षण ।
मृत्य न म्हणे विचक्षण । बहु बोलिका ॥ ३३ ॥
मृत्य न म्हणे हा आधारु । मृत्य न म्हणे उदार ।
मृत्य न म्हणे हा सुंदर । चतुरांग जाणे ॥ ३४ ॥
मृत्य न म्हणे पुण्यपुरुष । मृत्य न म्हणे हरिदास ।
मृत्य न म्हणे विशेष । सुकृती नर ॥ ३५ ॥
आतां असो हें बोलणें । मृत्यापासून सुटिजे कोणें ।
मागेंपुढें विश्वास जाणें । मृत्युपंथें ॥ ३६ ॥
च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी ।
जन्मा आले तितुके प्राणी । मृत्य पावती ॥ ३७ ॥
मृत्याभेणें पळों जातां । तरी मृत्य सोडिना सर्वथा ।
मृत्यास न ये चुकवितां । कांहीं केल्या ॥ ३८ ॥
मृत्य न म्हणे हा स्वदेसी । मृत्य न म्हणे हा विदेसी ।

मृत्य न म्हणे हा उपवासी । निरंतर ॥ ३९ ॥
मृत्य न म्हणे थोर थोर । मृत्य न म्हणे हरिहर ।
मृत्य न म्हणे अवतार । भगवंताचे ॥ ४० ॥
श्रोतीं कोप न करावा । हा मृत्यलोक सकळांस ठावा ।
उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्यपंथें ॥ ४१ ॥
येथें न मनावा किंत । हा मृत्यलोक विख्यात । var मानावा
प्रगट जाणती समस्त । लहान थोर ॥ ४२ ॥
तथापी किंत मानिजेल । तरी हा मृत्यलोक नव्हेल ।
याकारणें नासेल । उपजला प्राणी ॥ ४३ ॥
ऐसें जाणोनियां जीवें । याचें सार्थकचि करावें ।
जनीं मरोन उरवावें । कीर्तिरूपें ॥ ४४ ॥
येरवीं प्राणी लहान थोर । मृत्य पावती हा निर्धार ।
बोलिलें हें अन्यथा उत्तर । मानूंची नये ॥ ४५ ॥
गेले वहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ।
गेले अगाध महिमेचे । मृत्यपंथें ॥ ४६ ॥
गेले बहुत पराक्रमी । गेले बहुत कपटकर्मी ।
गेले बहुत संग्रामी । संग्रामसौरे ॥ ४७ ॥
गेले बहुतां बळांचे । गेले बहुतां काळांचे ।
गेले बहुतां कुळांचे । कुळवंत राजे ॥ ४८ ॥
गेले बहुतांचे पाळक । गेले बुद्धीचे चाळक ।
गेले युक्तीचे तार्किक । तर्कवादी ॥ ४९ ॥
गेले विद्येचे सागर । गेले बळाचे डोंगर ।
गेले धनाचे कुबेर । मृत्यपंथे ॥ ५० ॥
गेले बहुत पुरुषार्थाचे । गेले बहुत विक्रमाचे ।
गेले बहुत आटोपाचे । कार्यकर्ते ॥ ५१ ॥
गेले बहुत शस्त्रधारी । गेले बहुत परोपकारी ।
गेले बहुत नानापरी । धर्मरक्षक ॥ ५२ ॥
गेले बहुत प्रतापाचे । गेले बहुत सत्कीर्तीचे ।
गेले बहुत नीतीचे । नीतिवंत राजे ॥ ५३ ॥
गेले बहुत मतवादी । गेले बहुत कार्यवादी ।
गेले बहुत वेवादी । बहुतांपरीचे ॥ ५४ ॥
गेलीं पंडितांची थाटें । गेलीं शब्दांचीं कचाटें ।
गेलीं वादकें अचाटें । नाना मतें ॥ ५५ ॥
गेले तापषांचे भार । गेले संन्यासी अपार ।
गेले विचारकर्ते सार । मृत्यपंथे ॥ ५६ ॥
गेले बहुत संसारी । गेले बहुत वेषधारी ।
गेले बहुत नानापरी । नाना छंद करूनी ॥ ५७ ॥
गेले ब्राह्मणसमुदाये । गेले बहुत आच्यार्य ।
गेले बहुत सांगों काये । किती म्हणौनि ॥ ५८ ॥
असो ऐसे सकळहि गेले । परंतु येकचि राहिले ।
जे स्वरुपाकार जाले । आत्मज्ञानी ॥ ५९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मृत्यनिरूपणनाम
समास नववा ॥ ९ ॥ ३.९

समास दहावा : वैराग्य निरूपण
॥ श्रीराम ॥
संसार म्हणिजे माहापूर । माजीं जळचरें अपार ।
डंखूं धावती विखार । काळसर्प ॥ १ ॥
आशा ममता देहीं बेडी । सुसरी करिताती तडातोडी ।
नेऊन दुःखाचे सांकडी- । माजीं घालिती ॥ २ ॥
अहंकारनक्रें उडविलें । नेऊनि पाताळीं बुडविलें ।
तेथुनियां सोडविलें । न वचे प्राणी ॥ ३ ॥
काममगरमिठी सुटेना । तिरस्कार लागला तुटेना ।
मद मत्सर वोहटेना । भूलि पडिली ॥ ४ ॥
वासनाधामिणी पडिली गळां । घालून वेंटाळें वमी गरळा ।
जिव्हा लाळी वेळोवेळां । भयानक ॥ ५ ॥
माथां प्रपंचाचें वोझें । घेऊन म्हणे माझें माझें ।
बुडतांही न सोडी, फुंजे । कुळाभिमानें ॥ ६ ॥
पडिलें भ्रांतीचें अंधारें । नागविलें अभिमानचोरें ।
आलें अहंतेचें काविरें । भूतबाधा ॥ ७ ॥
बहुतेक आवर्तीं पडिले । प्राणी वाहातचि गेले ।
जेंहिं भगवंतासी बोभाईलें । भावार्थबळें ॥ ८ ॥
देव आपण घालूनि उडी । तयांसी नेलें पैलथडी ।
येर तें अभाविकें बापुडीं । वाहातचि गेलीं ॥ ९ ॥
भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ।
संकटीं पावे भाविकाला । रक्षितसे ॥ १० ॥
जयास भगवंत आवडे । तयाचें देवासीं सांकडें ।
संसारदुःख सकळ उडे । निजदासाचें ॥ ११ ॥
जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे ।
धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ॥ १२ ॥
जैसा भाव जयापासीं । तैसा दैव तयासी ।
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्रांचा ॥ १३ ॥
जरी भाव असिला माईक । तरी देव होये माहा ठक ।
नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ॥ १४ ॥
जैसें जयाचें भजन । तैसेंची दे समाधान ।
भाव होतां किंचित न्यून । आपणहि दुरावे ॥ १५ ॥
दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैस्यास तैसें भासे ।
तयाचें सूत्र असे । आपणाच पासीं ॥ १६ ॥
जैसें आपण करावें । तैसेंचि तेणें व्हावें ।
जरी डोळे पसरूनि पाहावें । तरी तेंही टवकारे ॥ १७ ॥
भृकुटीस घालून मिठी । पाहातां क्रोधें तेंहि उठी ।
आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥ १८ ॥
जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला ।
जो जैसें भजे त्याला । तैसाचि वोळे ॥ १९ ॥
भावें परामार्थाचिया वाटा । वाहाती भक्तीचिया पेंठा ।
भरला मोक्षाचा चोहाटा । सज्जनसंगें ॥ २० ॥
भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरी पावन जाले ।

भावार्थबळें उद्धरिले । पूर्वज तेहीं ॥ २१॥
आपण स्वयें तरले । जनासहि उपेगा आले ।
कीर्तिश्रवणें जाले । अभक्त, भावार्थी ॥ २२॥
धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं ।
तेहिंच येक जन्म जनीं । सार्थक केला ॥ २३॥
तयांची वर्णू काय थोरी । जयांचा भगवंत कैवारी ।
कासे लाऊन उतरी । पार दुःखाचा ॥ २४॥
बहुतां जन्मांचे सेवटीं । जेणें चुके अटाटी ।
तो हा नरदेह भेटी । करी भगवंतीं ॥ २५॥
म्हणौन धन्य ते भाविक जन । जेंहिं जोडिलें हरिनिधान ।
अनंत जन्मांतरींचें पुण्य । फळासि आलें ॥ २६॥
आयुष्य हेचि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं ।
ईश्वरीं अर्पूनिया लुटी । आनंदाची करावी ॥ २७॥
हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ ।
सदा सर्वदा संतुष्ट । नैराशबोधें ॥ २८॥
धरून ईश्वराची कास । केली संसाराची नैराश ।
तयां भाविकां जगदीश । सबाह्य सांभाळी ॥ २९॥
जया संसाराचें दुःख । विवेकें वाटे परमसुख ।
संसारसुखाचेनि पढतमूर्ख । लोधोन पडती ॥ ३०॥
जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा ।
जयांचा जनावेगळा । ठेवा आक्षै ॥ ३१॥
ते आक्षै सुखें सुखावले । संसारदुःखें विसरले ।
विषयेरंगी वोरंगले । श्रीरंगरंगीं ॥ ३२॥
तयांस फावली नरदेह पेटी । केली ईश्वरेंसिं साटी ।
येरें अभाविकें करंटीं । नरदेह गेला ॥ ३३॥
आवचटें निधान जोडलें । तें कवडिच्या बदल नेलें ।
तैसें आयुष्य निघोनि गेलें । अभाविकाचें ॥ ३४॥
बहुता तपाचा सांठा । तेणें लाधला परीस गोटा ।
परी तो ठाईंचा करंटा । भोगूंच नेणे ॥ ३५॥
तैसा संसारास आला । मायाजाळीं गुंडाळला ।
अंतीं येकलाचि गेला । हात झाडुनी ॥ ३६॥
या नरदेहाचेनि संगतीं । बहुत पावले उत्तम गती ।
येकें बापुडी यातायाती । वरपडी जालीं ॥ ३७॥
या नरदेहाचेनि लागवेगें । सार्थक करावे संतसंगें ।
नीचयोनीं दुःख मागें । बहुत भोगिलें ॥ ३८॥
कोण समयो येईल कैसा । याचा न कळे किं भर्वसा ।
जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ॥ ३९॥
तैसें वैभव हें सकळ । कोण जाणे कैसी वेळ ।
पुत्रकळत्रादि सकळ । विघडोन जाती ॥ ४०॥
पाहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली ।
देह पडतांच ठेविली- । आहे नींच योनी ॥ ४१॥
स्वान शुकरादिक नीच याती । भोगणें घडे विपत्ती ।
तेथे कांहीं उत्तम गती । पाविजेत नाहीं ॥ ४२॥
मागा गर्भवासीं आटाटी । भोगितां जालासि रे हिंपुटी ।
तेथुनियां थोरा कष्टीं । सुटलासि दैवें ॥ ४३॥
दुःख भोगिलें आपुल्या जीवें । तेथें कैचिं होतीं सर्वें ।
तैसेंचि पुढें येकलें जावें । लागेल बापा ॥ ४४॥
कैंचि माता कैंचा पिता । कैंचि बहिण कैंचा भ्राता ।
कैंचीं सुहृदें कैंची वनिता । पुत्रकळत्रादिक ॥ ४५॥
हे तूं जाण मावेचीं । आवघीं सोइरीं सुखाचीं ।
हे तुज्या सुखदुःखाचीं । सांगाती नव्हेती ॥ ४६॥
कैंचा प्रपंच कैंचे कुळ । कासया होतोसी व्याकुळ ।
धन कण लक्ष्मी सकळ । जाइजणें ॥ ४७॥
कैंचें घर कैंचा संसार । कासया करिसी जोजार ।
जन्मवरी वाहोन भार । सेखीं सांडून जासी ॥ ४८॥
कैंचें तारुण्य कैंचे वैभव । कैंचें सोहळे हावभाव ।
हें सकळहि जाण माव । माईक माया ॥ ४९॥
येच क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी ।
माझें माझें म्हणतोसी । म्हणौनियां ॥ ५०॥
तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ।
स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष ॥ ५१॥
कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं ।
तें तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ॥ ५२॥
तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार ।
आतां येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें ॥ ५३॥
येका दुर्भराकारणें । नाना नीचांची सेवा करणें ।
नाना स्तुती आणी स्तवनें । मर्यादा धरावी ॥ ५४॥
जो अन्न देतो उदरासी । शेरीर विकावें लागे त्यासी ।
मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥ ५५॥
अहिर्निशीं ज्या भगवंता । सकळ जिवांची लागली चिंता ।
मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥ ५६॥
भूमि धरिली धराधरें । प्रगट होईजे दिनकरें ।
ऐसी सृष्टी सत्तामात्रें । चालवी जो कां ॥ ५७॥
ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव ।
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ॥ ५८॥
ऐसा सर्वात्मा श्रीराम- । सांडून, धरिती विषयकाम ।
ते प्राणी दुरात्मे अद्धम । केलें पावती ॥ ५९॥
रामेविण जे जे आस । तितुकी जाणावी नैराश ।
माझें माझें सावकाश । सीणचि उरे ॥ ६०॥
जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा ।
विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ॥ ६१॥
सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन ।
त्यासी कैंचें समाधान । लोलंगतासी ॥ ६२॥
जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें ।
स्वजन सकळही त्यागावे । दुःखमूळ जे ॥ ६३॥
जेथें वासना झोंबोन पडे । तेणेंचि अपायें दुःख जडे ।

म्हणौनि विषयवासना मोडे । तो येक सुखी ॥ ६४॥
विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख ।
पूर्वी गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ॥ ६५॥
गळ गिळितां सुख वाटे । वोढून घेतां घसा फाटे ।
कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊन पळतां ॥ ६६॥
तैसी विषयसुखाची गोडी । गोड वाटे परी ते कुडी ।
म्हणौनियां आवडी । रघुनाथीं धरावी ॥ ६७॥
ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक ।
सांगा स्वामी येमलोक । चुके जेणें ॥ ६८॥
देवासी वास्तव्य कोठें । तो मज कैसेंनि भेटे ।
दुःखमूळ संसार तुटे । कोणेपरी स्वामी ॥ ६९॥
धडपुडी भगवत्प्राप्ती- । होऊन, चुके अधिगती ।
ऐसा उपाये कृपामूर्ती । मज दीनास करावा ॥ ७०॥
वक्ता म्हणे हो येकभावें । भगवद्भजन करावें ।
तेणें होईल स्वभावें । समाधान ॥ ७१॥
कैसें करावें भगवद्भजन । कोठें ठेवावें हें मन ।
भगवद्भजनाचें लक्षण । मज निरोपावें ॥ ७२॥
ऐसा म्लानवदनें बोले । धरिले सदृढ पाऊलें ।
कंठ सद्गदित, गळाले । अश्रुपात दुःखें ॥ ७३॥
देखोन शिष्याची अनन्यता । भावें बोळला सद्गुरु दाता ।
स्वानंद तुंबळेल आतां । पुढिले समासीं ॥ ७४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वैराग्यनिरूपणनाम
समास दहावा ॥ १०॥ ३.१०
॥ दशक तिसरा समाप्त ॥

NA
Proofread by Vishwas Bhide and Sunder Hattangadi.
Reproofread by P. D. Kulkarni
